ePaper आमच्याकडे पक्ष आणि चिन्ह नाही, भाजप का आम्हाला सोबत घेणार; संजय राऊत



| वर्ष - 7 | अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 28 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


**आतील पानांत**

- रोहन बोपन्नाने रचला इतिहास!
- मी स्वतःला सिद्ध करून थकलेय
- अखिलेशकडून काँग्रेसची बोळवण
- हा एकनाथ शिंदे शब्द पाळणारा


# मराठा समाजाचा आनंदोत्सव!

## मनोज जरांगे-पटलांचा लढा यशस्वी : राज्यभरात निर्णयाचे स्वागत

**आंदोलनाची सुरुवात झाली 'त्या' आंतरवाली सराटीसह राज्यभरात मराठ्यांचा जल्लोष**

**चेहऱ्यावर हास्य, रस्त्यावर फुगडी आणि घोषणाबाजी..**

। पिंपरी । महाईन्यूज ।

मनोज जरांगे यांनी ज्या ठिकाणाहून मराठा आरक्षणाचा लढा उभा केला, त्या आंतरवाली सराटी गावांमध्ये देखील आंदोलन करणाऱ्या गावकऱ्यांनी जल्लोष सुरु केला आहे. फटाके फोडून, पेढे भरवत, गुलाल लावून आंदोलकांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. गावांमध्ये आनंदाच आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांचे जन्मगाव मातोरीसह राज्यभरात गावागावात असाच जल्लोष पाहायला मिळत आहे. मराठा समाजासाठी प्राणांची बाजी लावून आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची यशस्वी सांगता झाल्यानंतर मराठा बांधवांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचा एकच जयघोष केला. जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य करत मुख्यमंत्री शिंदे यांनी आपण केवळ मतासाठी नव्हे तर समाजाच्या हितासाठी काम करत असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे मराठा समाजाच्या बांधवांनी मुख्यमंत्र्यांच्या नावाचा एकच जयघोष करत त्यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांनीही गाडीतून बाहेर येत समाज बांधवांनी दाखवलेल्या या प्रेमाचा विनम्रपणे स्वीकार केला.





### मातोरीत गावकऱ्यांचा जल्लोष

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण घेऊनच परत येणार अशी घोषणा केली होती. आज अखेर ही घोषणा खरी ठरली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या जन्मगावी मातोरीत डीजेच्या तालामध्ये भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली आहे. गुलाल उधळला जातोय, पेढे वाटले जात आहेत आणि यामध्ये अख्खा गाव नाचतांना पाहायला मिळत आहे. गावातील महिला सुद्धा या आनंद उत्सवामध्ये सहभागी झाल्या आहेत.

### नाशिकमध्ये विजयोत्सव साजरा

मराठा समाजाच्या आरक्षणाचा अध्यादेश निघाल्यानंतर नाशिकमध्ये मराठा समाजाच्या वतीने विजय उत्सव साजरा करण्यात येत आहे. सकल मराठा समाजाच्यावतीने नाशिक रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जल्लोष साजरा करण्यात आला. घोषणाबाजी, आतषबाजी, आणि गुलालाची उधळण करत विजय उत्सव साजरा करण्यात आला.

### सोलापुरातही जल्लोष...

मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्यानंतर राज्यभरात याचा आनंद साजरा केला जात आहे. दरम्यान, सोलापुरात देखील जल्लोष साजरा केला जात आहे. मराठा समाज बांधवासह मुस्लिम बांधव देखील जल्लोषात सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले. गुलाल उधळत, डान्स करीत, फटाक्यांच्या आतिषबाजीत हा आनंद उत्सव साजरा करण्यात आला. गेली अनेक दशक जे स्वप्न पाहिलेलं होते, ते स्वप्न आज पूर्ण झाल्याचा हा आनंद असल्याच्या मराठा समाजाच्या भावना आहे.

### बीड शहरात जल्लोष...

मराठा आरक्षणाचा निर्णय सरकारने घेतल्याबद्दल बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी मराठा समाजबांधव यांनी एकत्र येऊन जल्लोष साजरा केला. यावेळी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी देखील करण्यात आली. सोबतच जोरदार घोषणाबाजी देखील पाहायला मिळाल्या.

### परभणीत गावागावात जोरदार आनंदोत्सव...

मनोज जरांगे पाटील आणि मराठा समाजाचा आरक्षणाचा लढा यशस्वी झाला आहे. यानंतर गावागावांमध्ये जोरदार जल्लोष साजरा केला जात आहे. परभणीच्या कातनेश्वर गावामध्ये महिलांनी घरांसमोर वेगवेगळ्या रांगोळ्या काढल्यात, साखर वाटली जातेय, डीजे लावून गावांमध्ये मराठा समाजाकडून आनंदोत्सव सुरू आहे. तसेच फटाके फोडत, जोरदार गुलाल उधळून मराठा समाजाकडून आरक्षण मिळाल्याचा आनंद साजरा केला जात आहे.

### लोणावळ्यात गुलालाची उधळण

मनोज जरांगेंनी उभारलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला मोठं यश मिळालं आहे. याचा आनंद आता गावागावात साजरा व्हायला लागलाय. पुण्यातील लोणावळ्यात जिथं मुंबईत दाखल होण्यापूर्वी विराट सभा झाली होती, तिथंही मराठा बांधवांनी मोठा जल्लोष सुरू केलाय. गुलालाची उधळण करत, डीजेच्या तालावर जरांगे समर्थकांनी ठेका धरल्याचे पाहायला मिळाले.

### ठाण्यात मराठ्यांचा जल्लोष...

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला यश मिळाले असल्याने सर्वत्र मराठा समजा आनंद साजरा करत आहे. ठाण्यातील शासकीय विश्रामगृह येथे सकल मराठा समाजाकडून ढोल ताशाच्या गजरात एकमेकांना पेढे भरून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी जोरदारपणे घोषणाबाजी देखील देण्यात आल्या.

### अहमदनगर जिल्ह्यात मराठ्यांचा जल्लोष

अहमदनगर शहरातील माळीवाडा परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून, फटाके फोडून, एकमेकांना पेढे भरवत मराठा बांधवांकडून जल्लोष साजरा केला जातोय. यावेळी डीजेच्या तालावर मराठा बांधवानी ठेका धरलाय. विशेष म्हणजे मराठा समाजातील महिलांचाही यात मोठ्या संख्येने सहभाग पाहायला मिळत आहे.

# एकनाथ शिंदेंकडून मराठ्यांची दिशाभूल

## अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार नाही: उल्हास बापट

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून मराठा समाजाला आरक्षण दिल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्यानंतर ओबीसी नेत्यांनी विरोध केल्यानंतर आता घटनातज्ज्ञ सुद्धा साशंक आहेत. घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोललेला प्रत्येक शब्द लिहून ठेवल्याचे सांगत ओबीसींना धक्का न लावता 50 टक्क्यांवर, कायद्यात बसणारं, कोर्टात टिकणारं आरक्षण देऊ म्हणाले, ही जनतेची दिशाभूल आहे.**





ही लढाई सुप्रीम कोर्टात जाणार असून त्याठिकाणी भवितव्य निश्चित होईल, अशी प्रतिक्रिया दिली आहे.बापट यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले हे लोकशाहीचा विजय असल्याचे म्हणाले. मात्र, अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार की नाही हे सर्वोच्च न्यायालयात ठरवेल, असेही त्यांनी नमूद केले. एखादा समाज मागास आहे हे ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाला ट्रीपल टेस्ट करणं बंधनकारक केलं आहे. त्या नियमाची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे उल्हास बापट म्हणाले. उल्हास बापट म्हणाले की, मराठा समाज 80 ते 90 टक्के मागास आहे हे खरं असलं, तरी क्रिमिलेअरची व्याख्या केलेली नाही. आरक्षण दोन प्रकारे देता येते. एक कायदेमंडळ करते आणि दुरुस्ती करून वाढवते ते 2030 मध्ये होईल. कलम 15 आणि 16 मध्ये नोकऱ्या आणि शिक्षणासंदर्भात आहे. आरक्षण ही सुविधा, तो मुलभूत अधिकार नाही हे समजून घ्यावं लागेल. ते पुढे म्हणाले की, सध्या 50 टक्क्यांवर आरक्षण देता येत नाही.ते बदलायचं झाल्यास 11 न्यायमूर्तींचे घटनापीठ करून करावं लागेल. मात्र, अशी स्थिती नाही. कोणताही समाज मागास ठरवून आरक्षण देताना ट्रिपल टेस्ट असून मागासवर्गीय आयोग, इम्पिरिकल डेटा आणि ते 50 टक्क्यांवर वर जाता कामा नये, असा कायदा सांगतो. त्यामुळे दाखल्यातून दिलेलं आरक्षण हे बसतं का बघावं लागेल. त्याचबरोबर बापट यांनी देवेंद्र फडणवीसांनी दिलं होतं ते देता येणार नाही, हे मी सांगितलं होतं. पुढे सर्वोच्च न्यायालयात जाऊन रद्द होईल. त्यामुळे 50 टक्क्यांच्या आत ओबीसीमधून आरक्षण आणि मराठा मागास आहे हे सिद्ध करावं लागेल. जरांगेंनी तोच मुद्दा मांडला आम्ही मागास, ओबीसीमधून आरक्षण द्या अशी मागणी केल्याने त्यामुळे वाद सुरु झाल्याचे ते म्हणाले. मराठा आरक्षण 2018 मध्ये उच्च न्यायालयाने कसं मान्य केलं हे कळत नाही, सुप्रीम कोर्टाचा स्पष्ट निर्णय असातनाही दिलं गेलं. आरक्षण देताना मागास आयोगाने मागास ठरवलं पाहिजे, त्यांनी ठरवून ताजा डेटा सांगितला पाहिजे. सगळ्यांकडे एक पाहिजे, तरच हे कोर्टात टिकेल. इथून निश्चित लोक सुप्रिम कोर्टात जाणार असल्याने सुप्रीम कोर्ट काय ते ठरवेल, असेही त्यांनी सांगितले. बापट यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले हे लोकशाहीचा विजय असल्याचे म्हणाले. मात्र, अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार की नाही हे सर्वोच्च न्यायालयात ठरवेल, असेही त्यांनी नमूद केले. एखादा समाज मागास आहे हे ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाला ट्रीपल टेस्ट करणं बंधनकारक केलं आहे. त्या नियमाची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे उल्हास बापट म्हणाले. उल्हास बापट म्हणाले की, मराठा समाज 80 ते 90 टक्के मागास आहे हे खरं असलं, तरी क्रिमिलेअरची व्याख्या केलेली नाही. आरक्षण दोन प्रकारे देता येते. एक कायदेमंडळ करते आणि दुरुस्ती करून वाढवते ते 2030 मध्ये होईल.

### मराठा मागास आहे हे सिद्ध करावं

कलम 15 आणि 16 मध्ये नोकऱ्या आणि शिक्षणासंदर्भात आहे. आरक्षण ही सुविधा, तो मुलभूत अधिकार नाही हे समजून घ्यावं लागेल. ते पुढे म्हणाले की, सध्या 50 टक्क्यांवर आरक्षण देता येत नाही. ते बदलायचं झाल्यास 11 न्यायमूर्तींचे घटनापीठ करून करावं लागेल. मात्र, अशी स्थिती नाही. कोणताही समाज मागास ठरवून आरक्षण देताना ट्रिपल टेस्ट असून मागासवर्गीय आयोग, इम्पिरिकल डेटा आणि ते 50 टक्क्यांवर वर जाता कामा नये, असा कायदा सांगतो. त्यामुळे दाखल्यातून दिलेलं आरक्षण हे बसतं का बघावं लागेल. त्याचबरोबर बापट यांनी देवेंद्र फडणवीसांनी दिलं होतं ते देता येणार नाही, हे मी सांगितलं होतं. पुढे सर्वोच्च न्यायालयात जाऊन रद्द होईल. त्यामुळे 50 टक्क्यांच्या आत ओबीसीमधून आरक्षण आणि मराठा मागास आहे हे सिद्ध करावं लागेल. जरांगेंनी तोच मुद्दा मांडला आम्ही मागास, ओबीसीमधून आरक्षण द्या अशी मागणी केल्याने त्यामुळे वाद सुरु झाल्याचे ते म्हणाले.

# संस्था चालकाकडून तीन अल्पवयीन मुलांवर अत्याचार

## आरोप दासोपंत उर्फ स्वामी हरिभाऊ उंडाळकरवर गुन्हा दाखल

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वारकरी संप्रदायाला हदरवणारी घटना पुण्यातील देवाची आळंदीत (DEVACHI ALANDI PUNE) घडली आहे. एका महाराजावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानं वारकरी सांप्रदयामध्ये मोठी खळबळ उडाली आहे. तीन अल्पवयीन मुलांवर नैसर्गिक कृत्य केल्याचा आरोप या महाराजावर आहे. दासोपंत उर्फ स्वामी हरिभाऊ उंडाळकर (52 वर्षे) असं या नराधम महाराजाचे नाव आहे.**

दासोपंत महाराज मृदुंग वारकरी शिक्षण संस्था चालवतो. साधारण सत्तर विद्यार्थी दासोपंत महाराजांकडे मृदुंग वाद्याचं धडे घेतात. पण दिवाळीनंतर दासोपंत बिथरले, सुरुवातीला एक व्यसनाधीन विद्यार्थ्याला ब्लॅकमेल केलं आणि त्याच्यावर अनैसर्गिक कृत्य केलं.

मग त्यानंतर दासोपंत महाराजांमधील हैवान जागा झाला. तीन विद्यार्थांवर मनाची इच्छा पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी अनैसर्गिक कृत्य करतच राहिले. कोणाला सांगितल्यास बरं वाईट होईल असं त्यानं धमकावले होते. मात्र एका विध्यार्थ्याला या वेदना असह्य झाल्यानं, त्याने वडिलांच्या कानावर ही बाब टाकलीसुरुवातीला पोलिसांना ही यावर विश्वास बसेना. त्यामुळं पोलिसांनी गुन्हा दाखल



करण्याऐवजी याकडे कानाडोळा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळं पीडिताच्या पालकाने गोंधळ घातला.

मग वरिष्ठांनी यात लक्ष घातलं. सदरच्या मुलीने आपल्या आईला या अत्याचाराचे माहिती दिल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

### पुन्हा एक तारखेला चौकशी

हा गुन्हा दाखल झाल्यानंतर दासोपंत महाराजांचं बिंग फुटलं. हे पाहून उर्वरित दोन मुलांनीही त्यांच्या कुटुंबाला याबाबत कळवलं. त्यामुळं आतापर्यंत तीन अल्पवयीन मुलांवर नराधम दासोपंत महाराजांवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पॉस्को कलमाखाली आळंदी पोलिसांनी गुन्हा दाखल करून नराधम महाराजास बेड्या ठोकल्या आहेत. आणखी कुणी पीडित असल्यास त्यांना पुढं येण्याचं आवाहनही पोलिसांनी केलंय. या घटनेमुळं वारकरी संप्रदायात मात्र एकच खळबळ उडालेली आहे.लातूर जिल्ह्यातील वलांडी या गावातील एका सहा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघड झाली आहे. याच गावातील अल्ताफ महेबूब कुरेशी या युवकांने घराशेजारी राहणाऱ्या सहा वर्षीय मुलीवर काही दिवसापासून लैंगिक अत्याचार केल्याची माहिती समोर आली.

# 'एसटीपी'साठी खासगी सल्लागाराला सोसायटीधारकांचा विरोध!

## महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना आंदोलनाचा इशारा

### चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची आक्रमक भूमिका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वयीत आहेत किंवा नाही? याची तपासणी करण्यासाठी खासगी सल्लागार नियुक्ती आणि अर्थिक उधळपट्टीच्या धोरणाला चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने विरोध केला आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासन शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरातील गृहनिर्माण संस्थांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू ठेवण्याबाबत प्रशासनाने बंधनकारक केले आहे. मात्र, काही सोसायट्यांमध्ये एसटीपी बंद असवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे. पर्यावरण संवर्धन, पाणी बचत आणि नागरी आरोग्याच्या दृष्टीने सदर एसटीपी प्रकल्प कायमस्वरुपी कार्यान्वयीत असणे आवश्यक आहे. असे असले तरी एसटीपी प्रकल्प कार्यान्वयीत ठेवणे आणि नियंत्रण ठेवण्याबाबत प्रशासनाने खासगी सल्लागार नियुक्तीबाबत कार्यवाही सुरू केली आहे.

या कामासाठी खासगी सल्लागार नियुक्तीला नागरिकांचा विरोध असून, ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी आमची मागणी आहे.




पिंपरी-चिंचवडकरांच्या कररुपी पैशातून महापालिका प्रशासन विविध कामे, विकास प्रकल्प राबवत असते. एखाद्या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्ती केल्यास, त्याचे स्वागतच करायला हवे.

मात्र, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू आहेत किंवा नाही? या कामासाठीसुद्धा आपण सल्लागार कंपनींवर उधळपट्टी करीत असेल, तर महापालिका प्रशासनाच्या पारदर्शिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असेही फेडरेशनने म्हटले आहे.

तसेच, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने शहरातील ३३१ मोठ्या संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची खासगी संस्थेमार्फत पाहणी केली होती. त्यापैकी २८४ संस्थांमध्ये प्रकल्प सुरू आहेत. ४७ संस्थांमध्ये एसटीपी बंद होते. त्यांना प्रशासनाने नोटीस बजावली आहे. असे असताना पुन्हा खासगी सल्लागार नियुक्ती करुन एसटीपीबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### ... अन्यथा आंदोलन करणार!

» सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला भेट देणे, साप्ताहिक अहवाल सादर करणे, प्रकल्प कार्यान्वयीत असल्याबाबत माहिती संकेतस्थळावर टाकणे, पुन:वार याबाबत पाहणी करणे अशी कामे सध्या पर्यावरण विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांतील संबंधित विभागाचे कर्मचारी करीत आहेत. मग, याच कामासाठी पुन्हा नव्याने खासगी सल्लागार संस्था नियुक्त करणे उचीत होणार नाही. त्यामुळे सदर कामासाठी सुरू असलेली निविदा प्रक्रिया रद्द करावी, अशी आग्रही मागणी आहे. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा सोसायटीधारकांना सोबत घेवून आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, याची नोंद घ्यावी, असा इशारा सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी दिला आहे.

“ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हे सल्लागारांवर खूप मेहरबान आहेत. साध्या आणि किरकोळ गोष्टीवरही खाजगी सल्लागारांची नेमणूक करून नागरिकांच्या कररुपी पैशाची उधळपट्टी चालू आहे ती आयुक्तांनी थांबवली पाहिजे. शहरातील सहकारी गृहरचना संस्थांमध्ये मैलाशुद्धीकरण केंद्र चालू आहेत का नाहीत? यासाठी खाजगी संस्थेकडून सल्लागार नियुक्त करणे या गोष्टीला आमचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे अशा कोणत्याही प्रकारच्या खाजगी संस्थेकडून सल्लागाराची नियुक्ती करण्यात येऊ नये. अन्यथा सर्व सोसायटी धारकांना घेऊन खूप मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल.

**-संजीवन सांगळे,**
**अध्यक्ष , चिखली-मोशी- चऱ्होली- पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.**

---

# फुले दांपत्यांमुळेच कोट्यवधी स्त्रियांना ज्ञानमंदिराचे द्वार खुलेः खासदार कोल्हे

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी-चिंचवडच्या वतीने "सत्यशोधक" चित्रपटाच्या स्क्रिनिंगचे आयोजन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंस्त्रियांच्या जीवनात शिक्षणाची मशाल पेटवण्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिराव फुले यांनी असंख्य चटके सोसले. त्यांच्या त्यागाचे, संघर्षाचे फलित म्हणून आज देशातील कोट्यवधी स्त्रियांना ज्ञानमंदिराचे द्वार खुले आहे. फुले दांपत्यांनी प्रतिकूल परिस्थितीत सर्व जाती-धर्माच्या साथीदारांना घेऊन आपल्या येणाऱ्या पिढ्यांसाठी जो संघर्ष केला. त्यांचे उपकार बहुजन समाज कधीच विसरणार नाही. असे मत शिरूर लोकसभेचे खासदार संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवडच्यावतीने (दि.२५) भोसरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, नागरिकांसाठी विशाल सिनेमा पिंपरी येथे "सत्यशोधक" या चित्रपटाच्या विशेष स्क्रिनिंगचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिरूर लोकसभेचे खासदार संसदरत्न डॉ अमोल कोल्हे बोलत होते.**



यावेळी फुले दाम्पत्याच्या संघर्षाची कहाणी सांगणाऱ्या "सत्यशोधक" चित्रपटाच्या स्क्रिनिंगचे आयोजन केल्याबद्दल युवक शहराध्यक्ष इम्रानभाई शेख यांचे अभिनंदन केले. बहुजन समाज एकसंघ व्हावा, यासाठी विविध उपक्रमातून इम्रानभाई शेख व त्यांच्या युवक पदाधिकारी यांचा सातत्याने पुढाकार असतो, विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे "शिव-शाहू-फुले-आंबेडकर" पुरोगामी विचार घराघरात नेण्यासाठी ते विविध उपक्रमांतून कार्यरत असतात. हे समाजकार्य युवकांनी यापुढेही अखंड सुरू ठेवावे, अशा शुभेच्छा कोल्हे यांनी युवक पदाधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रान शेख म्हणाले "सध्याच्या काळात सत्ताधारी कोणत्या ना कोणत्या मार्गाने आपल्याला जात, पंथ, धर्म अशा गोष्टींच्या गाळात अडकवत आहेत. बहुजन समाजावर कळत नकळतपणे जी भेदभावाची झापड निर्माण झाली आहे, ते पुसण्याचे काम "सत्यशोधक" चित्रपट करतो.महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाईंच्या विचारांना समजून घ्यायचेअसेल तर सत्यशोधक चित्रपट सर्व बहुजनांनी अवश्य बघावा. महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास आपल्याला प्रेरणा देतो, अस्वस्थ करतो आणि स्वतःच्या पलीकडे बघायला भाग पाडतो. म्हणून बहुजन युवक, युवती, महिला यांच्या प्रबोधनासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून आम्ही हा चित्रपट नागरिकांना मोफत दाखवला."

### पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित...

» यावेळी चित्रपट निर्माते बाळासाहेब बांगर, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, युवक शहर कार्याध्यक्ष सागर तापकीर, विद्यार्थीअध्यक्ष राहुल आहेर, माजी उपमहापौर विश्रांती पाडळे, भोसरी विधानसभाअध्यक्ष संतोष शिंदे, प्रदेश संघटक राहुल पवार, सरचिटणीस मेघराज लोखंडे, शहरसचिव रजनीकांत गायकवाड, संघटक ऋषिकेश गाडे, अमोल माळी, रेखा मोरे स्वप्नाली असोले, संतोष माळी, राजश्री भालेराव, फहिम शेख, शोभा साठे, विकास कांबळे, मयूर खरात, अशोक कोळी आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.




# राम मंदिर हा केवळ पहिला टप्पा..!

**पुन्हा भारत जोडो यात्रेवर निघालेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राम मंदिर सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदीकेंद्रित राजकीय कार्यक्रम असल्याची टीकाही केली. मंदिर कार्यक्रमाचा उदोउदो लोकसभा निवडणूक समोर ठेवून झाल्याचे विरोधी पक्षांच्या बहुतांश नेत्यांनी बोलून दाखवले.**

पण, अयोध्येत राम मंदिर बांधून, लोकसभा निवडणुकीपूर्वी मंदिराचे उद्‌घाटन करून भाजपला, नरेंद्र मोदींना लोकसभा निवडणुका जिंकायच्या आहेत अशीही टीका होते. कारण भाजपने आणि संघ परिवाराने सांस्कृतिक राष्ट्रवादाची घोषणा केली होती. राम मंदिर हे त्याच घोषणेचा एक टप्पा आहे. काशी, मथुरा हेदेखील पुढचे टप्पे आहेत. परंतु, आधी बऱ्याच लहान-मोठ्या मंदिरांच्या उभारणीतून भाजपने, संघ परिवाराने सांस्कृतिक राष्ट्रवादाची योजनाबद्धरीतीने मांडणी चालविली होती. त्यात, केवळ काशी विश्वनाथ कॉरिडोर, केदारनाथ मंदिर, उज्जैनमधील महाकाल मंदिरांचाच विकास झाला असे नव्हे; तर लोकदैवत आणि ग्रामदैवतांची मंदिरे बांधण्यात आली. त्यातून वंचित, दलित, मागासवर्गीय समुदायांना जोडण्याचाही आणि आपणही कोणी तरी आहोत या ओळखीकडून आपण हिंदू आहोत, अशी ओळख ठसविण्याचा प्रयत्न झालेला दिसतो आहे.कोणत्याही समुदायाच्या भावनिक श्रद्धाकेंद्रांचा आदर केल्यास त्या समुदायाला



जोडणे सोपे जाते, या न्यायाने वंचितांच्या श्रद्धास्थानांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. दलित, आदिवासी, अतिमागास जातींच्या वस्त्यांमध्ये स्थानिक दैवतांची मंदिरे लोकवर्गणीतून बांधण्यात आली आहेत. अर्थातच, त्यामध्ये पुढाकार संघ परिवारातील संघटनांचाच असला, तरी प्रत्येकाचे थोडेथोडे योगदान यातून त्यांना या मंदिरांशी जोडण्याचा प्रकार म्हणजे त्यांना नवी ओळख प्रस्थापित करण्याचा आहे. पंतप्रधान मोदींचे मागील 10 वर्षांतील धार्मिक स्थळांचे दौरे आणि त्यांच्या भाषणांमधून झालेला लोकदैवतांचा उल्लेख हा देखील त्याचाच एक भाग म्हणता येईल. उदाहरणार्थ, पंतप्रधान मोदींनी उत्तर प्रदेशातील मागासवर्गीय समुदायाचे ग्रामदैवत असलेल्या मोरी माईबद्दल उल्लेख केला होता. तर, वाराणसीतून लोकसभा खासदार झाल्यानंतर मोदींनी 'संसद आदर्श ग्राम योजने'मध्ये जयपुरा गाव 'दत्तक' घेतले. त्या गावातील अटलनगर ही दलित मुसहर समुदायाची वस्ती आहे. मुसहर समुदाय हा उंदीर पकडणारा. हा समुदाय स्वतःला शबरीचे वंशज मानणारा आहे. या वस्तीमध्ये संघातर्फे शबरीचे आणि शंकराचे मंदिर बांधण्यात आले. दलित मुसहर समुदायासाठी पूर्वी कोणतेही मंदिर संपूर्ण पंचक्रोशीत नव्हते. आता तिथे आपल्याच वस्तीत लोकवर्गणीतून बांधलेले मंदिर ही गोष्ट त्यांच्यासाठी अभिमान वाढविणारी ठरली. आता तिथे पन्नास हजार लोक जमा होतात. या शबरीच्या मंदिराच्या निमित्ताने ते अयोध्येतील राम मंदिराशी जोडले गेले आहेत. केवळ मुसहर हेच शबरीशी संबंध सांगणारे नाहीत, तर इतर आदिवासीदेखील शबरीशी नाते सांगणारे आहेत. रामायणातील जटायू व्यक्तिरेखा ही इतरांसाठी एक पात्र असेल, परंतु जटायूशी वांशिक नाते सांगणारेदेखील आदिवासी समूह आहेत. ते जटायूची पूजा करणारे आहेत.असेच एक उदाहरण निषाद समुदायाचेही सांगता येईल. काही महिन्यांपूर्वी गृहमंत्री अमित शहा यांची लखनौमध्ये सभा झाली होती. त्यात अमित शहा यांनी रामायणातील राम आणि निषाद राजाच्या मैत्रीची गोष्ट सांगितली. वनवासाला निघालेल्या रामाला, सीतेला आणि लक्ष्मणाला निषाद राजाने आपल्या नावेतून गंगा नदीच्या पैलतीरी नेले होते. त्या मैत्रीचे स्मरण म्हणून वनवास संपल्यानंतर राम निषाद राजाकडे आला होता. ही गोष्ट सांगितल्यानंतर शहा यांचे सांगणे होते, की आता रामाचे भव्य मंदिर उभारले जाणार आहे. त्यांचा हा प्रयत्न रामकथेच्या निमित्ताने निषाद समुदायाचे लक्ष राम मंदिराकडे वेधणारा होता. तर, अलीकडच्या काळात भाजप आणि निषाद पक्षाच्या संयुक्त जाहीर सभेला निषाद, गोंड, माळी, मल्लाह, केवट या समुदायांची उपस्थिती लक्षणीय होती आणि तेवढाच लक्षणीय या समुदायांकडून होणारा 'जय श्री राम!'आता अयोध्येतील राम मंदिरामध्ये राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांच्या मूर्ती आहेतच; परंतु मंदिर संकुलामध्ये महर्षी वाल्मीकी, माता शबरी, जटायू, निषादराज या रामायणातील व्यक्तिरेखांचीही मंदिरे आहेत. साहजिकच, या मंदिरांसोबत मुख्य राम मंदिरही या समुदायांसाठी आकर्षण केंद्र राहणार असेल.

## संपादकीय »

### उत्तर प्रदेशातील पेच

***लोकसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशात जागावाटपावरून समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांच्यात ताणाताणी सुरू आहे.***

दोन दिवसांपूर्वीच्या बैठकीत उभय पक्षांत जागावाटपावरून कोणताही ठोस निर्णय निघाला नाही. समाजवादी पक्षाचे सरचिटणीस प्रा. रामगोपाल यादव यांनी दोन्ही पक्षांनी जागावाटपाचे निम्मे अंतर पार केले असून निम्मा रस्ता अजून बाकी आहे, असे सांगितले.काँग्रेस नेते सलमान खुर्शिद यांनी जागावाटपात उभय पक्षांच्या नेत्यांत आणखी एक बैठक होणार असल्याचे सांगितले. राजकीय तज्ज्ञांच्या मते, उत्तर प्रदेशात अनेक जागांवर दोन्ही पक्षांचे मतैक्य नाही. काँग्रेसकडून अधिक जागा मागितल्या जात असून समाजवादी पक्षाकडून मात्र त्यास खोडा घातला जात आहे. त्यामुळे जागावाटपाचा पेच हा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. जागावाटपाचा तिढा मिटवण्यासाठी आणखी एक लवकरच बैठक होईल, अशी शक्यताही वर्तविली आहे. सपा नेते रामगोपाल यादव म्हणाले, काँग्रेसच्या निवडणूक समितीसमवेत एका एका जागेवर सविस्तर चर्चा झाली.

**विधि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानातील प्रास्ताविक समजावून सांगत असताना एकदम 'डेमोक्रॅटिक' आणि 'रिपब्लिक' असे शब्द आले. या संकल्पना समजावून सांगताना मराठीतील अनुक्रमे 'लोकशाही' आणि 'प्रजासत्ताक' या शब्दांचा आधार घेतला.**

# आपले गणतंत्र हरवले आहे का?

हे सुरू असताना मनात विचारांची गर्दी झाली आणि अनेक संदर्भ आठवू लागले. 'लोकशाही म्हणजे नक्की काय?' हा प्रश्न कोणी विद्यार्थी मला विचारत नाही. गुळगुळीत वाक्यांमधली स्पष्टीकरणेच प्रत्येकजण लहानपणापासून ऐकत असल्याने त्यावर सामान्य नागरिक काय, सरकारने देखील कधीच विचारणा केली नाही. 'प्रजासत्ताक' या संकल्पनेला देखील हेच लागू होते.मुळात 'सरकार' या शब्दालाच आक्षेप घेतला पाहिजे, 'गव्हर्नमेंट' म्हणजे 'सरकार' नाही तर त्याला 'शासन' असा प्रतिशब्द असायला हवा. अधिक चांगल्या प्रकारे प्रतिशब्द सांगायचा झाल्यास गव्हर्नमेंट म्हणजे 'सुशासन'. एक अशी व्यवस्था जी गुन्हेगारास शासन करते आणि यंत्रणेत सुव्यवस्था आणते. ही व्यवस्था पाहण्यासाठी लोक आपले प्रतिनिधी निवडतात आणि त्यालाच काहीसे लोकशाही किंवा अप्रत्यक्षरीत्या प्रजासत्ताक म्हणतात, असा समज आहे. वस्तुस्थिती पाहता, घटनाकारांना 'डेमोक्रॅटिक' म्हणायचे



आहे का ' डेमीक्रॅटिक' असा प्रश्न पडतो. देशात अजूनही 'राइट टू कॉल बॅक' (लोकप्रतिनिधींना माघारी बोलवण्याचा-प्रतिनिधित्व काढून घेण्याचा अधिकार) आलेला नाही. मानवी हक्कांमध्ये देखील या अधिकाराला स्थान दिलेले नाही. लोकसेवा आयोग उमेदवार निवडताना अटी ठेवते, पण तशाच अटी लोकप्रतिनिधी निवडताना नाहीत. राजकीय पक्षाची विचारधारा वेगळी असू शकते पण शासनाची विचारधारा मात्र लोककल्याणकारी असायला हवी. ज्या देशात १४० कोटी जनता आहे त्या देशात लोकप्रतिनिधी ऋतूनिहाय अधिवेशन भरवतात, मात्र कोणीही नियमित अधिवेशन भरवण्यास उत्सुक नाही.प्राथमिक गरजा या प्राथमिक स्वरूपाच्याच ठेवण्याच्या मानसिकतेला समाजमन विरोध करीत नाही. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील काही उदाहरणे पाहता, अनेक देशांनी गेल्या ७५ वर्षांच्या अत्यंत कमी कालावधीत लोकांच्या प्राथमिक गरजा देखील किमान पूर्ण केल्या, तेथे आपला देश अजूनही अडखळतच चाललेला आहे. आपल्या देशात युवाशक्ती भरपूर आहे, मात्र त्याचे सुयोग्य नियोजन नाही. विकेंद्रीकरण केवळ नावालाच उरलेले असून मुळात ब्रिटीशकालीन व्यवस्था बदलण्याची मानसिकता अजून दिसून येत नाही. बाहुल्या नाचवणारा कळसूत्री सगळ्यांनाच आवडतो पण या खेळात आपण कळसूत्री नसून त्याच्या हातातील बाहुल्या आहोत, या प्रखर सत्याकडे कोणी नजर देत नाही. 'समाजमाध्यमे' या गोंडस नावाखाली आजकालची तरुणाई कोणती लोकशाही रुजू करीत आहे, हा खरोखरीच यक्षप्रश्न आहे. तलाठी परीक्षेसाठी किमान अर्हता बारावी असताना पदव्युत्तर आणि पीएचडी विद्यार्थी अर्ज करीत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हा एकनाथ शिंदे शब्द पाळणारा!

## शिवरायांची शपथ पूर्ण करणारा शेतकरी पुत्र : मुख्यमंत्री

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ज्यूस पिऊन उपोषण मागे घेतले. यानंतर मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे पाटील यांचं कौतुक करुन आपलं मनोगत व्यक्त केलं. मलाही गोरगरीब समाजाचं दुख आणि वेदना याची कल्पना आहे. म्हणून मी जाहीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतली होती. ती शपथ पूर्ण करण्याचं काम हा एकनाथ शिंदे करतोय. दिलेला शब्द पाळणं हीच माझी कार्यपद्धती आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.**



कुणबी प्रमाणपत्र नोंद सापडणाऱ्या कुटुंबाला सरसकट आरक्षण द्यावं आणि तिसरी मागणी होती ज्याची नोंद सापडली त्याच्या सग्यासोयऱ्यांनाही प्रमाणपत्र द्यावं अशा तीन मागण्या मनोज जरांगे पाटील यांच्या होत्या. त्या मागण्या मान्य करण्यात आल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: राजपत्र घेऊन नवी मुंबईत मनोज जरांगे यांची भेट घेतली. सर्व मागण्या मान्य करुन, मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे यांना गुलाल लावला. मराठा समाजासाठी ज्याने संघर्ष केला ते संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचं मी अभिनंदन करतो. फक्त राज्याचंच नव्हे तर संपूर्ण जगाचं लक्ष मराठा आंदोलनाकडे लागलं होतं. आपण अतिशय संयतपणे, शिस्तीत आंदोलन केलं. कुठेही आंदोलनाला गालबोट न लावता यशस्वी केलं, त्याबद्दल आपलं अभिनंदन करतो. आपल्या आंदोलनाचा कोणाला त्रास होणार नाही याची काळजी घेतली. मी सुद्धा एका शेतकरी कुटुंबातील शेतकऱ्याचा मुलगा आहे. मलाही गोरगरीब समाजाचं दुख आणि वेदना याची कल्पना आहे. म्हणून मी जाहीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतली होती. ती शपथ पूर्ण करण्याचं काम हा एकनाथ शिंदे करतोय. दिलेला शब्द पाळणं हीच माझी कार्यपद्धती आहे. आज धर्मवीर आनंद दिघे यांची जयंती आहे. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती नुकतीच झाली. या दोन्ही गुरुंचा आशिर्वाद माझ्या पाठिशी आहे. स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांच्या भूमीत आज हा ऐतिहासिक लढा यशस्वी झाला. त्यांनाही मी वंदन करतो. आमचं सरकार हे तुमचं सरकार आहे. आमचं सरकार शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं सरकार आहे. आम्ही कधीही मतासाठी नाही तर हितासाठी निर्णय घेतले. मराठा समाजाचा जो संघर्ष आहे, मराठ्यांनी अनेकांना मोठं केलं, मोठमोठी पदं अनेकांना मिळाली. परंतु मराठा समाजाला न्याय देत असताना, संधी आली तेव्हा त्यांनी संधी द्यायला हवी होती. पण आजचा दिवस हा तुमच्या विजयाचा दिवस आहे. तुम्ही गुलाल उधळण्याचा दिवस आहे.कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या मनोज जरांगे यांच्या पाठिशी सर्व मराठा समाज उभा राहिला. आज मुख्यमंत्रीही सर्वसामान्य माणूस आहे. त्यामुळे हे सरकार सर्वसामान्यांचा विचार करणारं आहे. सरकारने जे निर्णय घेतले त्यामध्ये, कुणबी प्रमाणपत्र देण्याचं शिंदे समितीला मुदतवाढ, प्रमाणपत्र देण्याचं शिबीर घेण्यासाठी अधिसूचना, नोंदी शोधण्यासाठी समिती, मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून कुणबी प्रमाणपत्र सोडून इतर कायद्याच्या चौकटीत टिकणारं, ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, असं मराठा आरक्षण ज्या ओबीसींना सवलती मिळतात, त्या सवलती मराठ्यांना दिल्या जातील, असं मुख्यमंत्री म्हणतील. आजचा आंदोलनाकडे सर्व मराठा बांधवांच लक्ष लागलं होतं. कुठल्याही प्रकारचे गालबोट लागले नाहीं. मी देखील शेतकऱ्याचा मुलगा आहे. गोरगरीब लोकांच्या अडचणी कळत आहे. मी त्यामुळेच मराठा आरक्षण देईल अशी शपथ घेतली होती. आज आनंद दिघे यांची आज जयंती आहे.

### मुख्यमंत्र्यांचा विरोध संपला : जरांगे

» बाळासाहेब ठाकरे यांची देखील जयंती नुकतीच पार पडली. या दोघांचे आशीर्वाद मला आहे. स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांच्या कर्मभुमित आपला लढा यशस्वी होतं आहे. आमचं सरकार म्हणजे हे तुमचं सरकारं आहे. आम्ही मतासाठी नाही तर हितासाठी निर्णय घेतले आहेत. अनेक मोठे नेते मराठा समाजात झाले. आजचा दिवस आनंदाचा दिवस आहे गुलाल उधळण्याचा दिवस आहे. आम्ही सर्व मागण्या मान्य केल्या आणि केवळ तुमच्या प्रेमापोटी इथ आलो. आज मनोज जरांगे यांनी सांगितलं की कुणबी नोंदी मराठवाड्यात सापडत नव्हती माञ आता लाखो कुणबी नोंदी सापडू लागल्या आहेत आपलं सरकारं घेणारे नाही तर देणारे आहे. मराठा समाज म्हणत होता की कुणाच्या ताटातील नको आमचं हक्काचं हवं आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगले काम केले आहे. आपला त्यांना विरोध संपला आहे. आपली मागणी मान्य झाली आहे. आपल्याला विरोध करणाऱ्यांना आपण विरोध होता. समाज म्हणून आपला विषय संपला आहे. मी मुख्यमंत्री यांच्या हस्ते जूस स्वीकारणार आहे. आपण त्यांच्या हस्ते पत्र स्वीकारणार आहोत. समाजाला मी मायबाप मानले आहे. मी तुम्हाला विचारून निर्णय घेतला आहे.

---

# फडणवीसांचा डीएनए का खवळत नाही : प्रकाश शेंडगे

## मराठा मागण्या मान्य केल्याने ओबीसी समाजाची फसवणूक झाली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारने आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना जातप्रमाणपत्रं दिली जाणार आहेत. तसेच त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही ही प्रमाणपत्रं मिळणार आहेत. यासह मराठा समाजातील लोकांना आता कुणबी जातप्रमाणपत्रांसह ओबीसी आरक्षण मिळेल. याला राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी कडाडून विरोध केला आहे.**

राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकारच्या या निर्णयावर आक्षेप नोंदवल्यानंतर ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनीदेखील सरकारच्या निर्णयाचा निषेध नोंदवला आहे.प्रकाश शेंडगे म्हणाले, राज्य सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्याने ओबीसी समाजाची मोठी फसवणूक झाली आहे. मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि ठाकरे गटाने आम्हाला शब्द दिला होता की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. मात्र आता तीन कोटी लोकसंख्या असलेला समाज कुणबी दाखल्यांसह ओबीसीत येणार असेल तर हा ओबीसींच्या आरक्षणाला लागलेला धक्का नाही का? या सरकारने आमच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यामुळे या सरकारचा निषेध करावा तितका कमी आहे.ओबीसी नेते म्हणाले, सर्व पक्षाच्या नेत्यांनी आम्हाला सागितलं होतं की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही.देवेंद्र फडणवीस तर म्हणाले होते की, आमचा डीएनए ओबीसी आहे. मग तो डीएनए आता शांत का आहे? तो डीएनए ओबीसींच्या बाजूने का खवळत नाही. सर्व पक्षांचे नेते म्हणाले होते, ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, शरद पवार म्हणाले होते ओबीसींच्या ताटातलं आरक्षण इतर कोणाला देऊ नये. परंतु, आता मराठा समाजाचा ओबीसीत समावेश केल्यानंतर उद्धव ठाकरे, शरद पवार, फडणवीस यांच्या काय भूमिका आहेत?प्रकाश शेंडगे म्हणाले, राज्यातल्या अनेक पक्षांचे ओबीसी सेल आहेत, ते आता बरखास्त केले जाणार का? त्या ओबीसी सेलमधील नेत्यांना मला प्रश्न विचारायचा आहे की, आता तुमची उघडपणे फसवणूक झाल्यानंतर तुम्ही काय करणार आहात? उलट मी त्यांना आवाहन करतो की, त्यांनी आमच्याबरोबर यावं, ओबीसी चळवळीसाठी काम करावं .



### सरकारचा निषेध करावा तितका कमी

» मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि ठाकरे गटाने आम्हाला शब्द दिला होता की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. मात्र आता तीन कोटी लोकसंख्या असलेला समाज कुणबी दाखल्यांसह ओबीसीत येणार असेल तर हा ओबीसींच्या आरक्षणाला लागलेला धक्का नाही का? या सरकारने आमच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यामुळे या सरकारचा निषेध करावा तितका कमी आहे.सर्व पक्षाच्या नेत्यांनी आम्हाला सागितलं होतं की, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही.

# नितीशकुमार एनडीएचे मुख्यमंत्री?

## » मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नसल्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिहारमधील अचानक बदललेल्या राजकीय वातावरणात मुख्यमंत्री नितीशकुमार पुढे काय घोषणा करणार, महाआघाडीत राहणार की राजीनामा देऊन भाजपसोबत जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, ते भाजपसोबत गेले तरी राजीनामा देणार नसून ते राजभवनात जाणार असून त्यांच्यासोबत भाजपला पाठिंबा देणारे पत्र असू शकते आणि राष्ट्रीय जनता दलाच्या मंत्र्यांना बडतर्फ केले जाऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे.**



भाजपने पाठिंबा दिल्यास नितीशकुमार यांना राजीनामा देण्याची गरज नाही, तेच मुख्यमंत्री राहतील, असे सांगण्यात येत आहे. अशा स्थितीत नितीशकुमार यांना फक्त राजदच्या आणि त्यांच्यासोबत आघाडीतील मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करावे लागेल. याचाच अर्थ नितीशकुमार हे आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न देताही सरकार बदलू शकतात.16 जून 2013 रोजी भाजपशी संबंध तोडल्यानंतर त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या नितीशकुमार यांनी आपल्या मंत्रिमंडळातील भाजपच्या 11 मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ केले. अशा परिस्थितीत नितीश कुमार पुन्हा एकदा 2013 च्या इतिहासाची पुनरावृत्ती करू शकतात. मात्र, यावेळी भाजपचे नव्हे तर राजदचे मंत्री बरखास्त केले जातील. 2013 मध्ये नितीशकुमार यांच्याकडे आमदारांचे मोठे पाठबळ होते. स्वबळावर ते बहुमताच्या जवळ जात होते. मात्र, या वेळी नितीशकुमार यांच्याकडे फक्त 45 आमदार आहेत. तर, भाजपकडे 78 आमदार आहेत. मुख्यमंत्री नितीशकुमार शनिवारी सरकारी कामात व्यस्त राहिले आणि विकासकामांसाठी बक्सरला भेट दिली. नितीशकुमार हे भाजपसोबत जाणार असल्याची चर्चा जोर धरू लागल्यानंतर इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये खळबळ उडाली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांना फोन केला पण ते नितीश कुमार यांच्याशी बोलू शकले नाहीत, असे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे, राजदने पाटणा येथे आमदारांची बैठक बोलावली. या बैठकीत राजदचे नेते आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी अजून खेळ पूर्ण होणे बाकी असल्याचे वक्तव्य केले. नितीशकुमार यांनी एनडीएसोबत जाण्यातील सर्व अडथळे दूर केले आहेत. जेडीयूची पुनर्रचना करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अध्यक्षांपासून ते नवी कार्यकारिणी तयार झाली आहे. विशेष म्हणजे राजीव रंजन उर्फ ललन सिंह यांची राष्ट्रीय अध्यक्षपदावरून हकालपट्टी केल्यानंतर आता त्यांची गठित कार्यकारिणी बरखास्त करून नवी समिती स्थापन करण्यात आली आहे. वशिष्ठ नारायण सिंह यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जयराम रमेश यांनी सांगितले की, ते कोणत्याही खात्री नसलेल्या वृत्तावर भाष्य करणार नाहीत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे नितीशकुमार यांच्याशी संपर्क करण्याच्या प्रयत्नात आहेत. इंडिया आघाडीला मजबूत करणे ही सर्वच पक्षांची जबाबदारी असून काँग्रेस यासाठी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी म्हटले. जयराम रमेश यांनी म्हटले की, 23 जून 2023 रोजी पाटणा येथे विरोधी पक्षनेत्यांची पहिली बैठक झाली होती.बिहारचे मुख्यमंत्री या बैठकीचे यजमान होते. दुसरी बैठक बेंगळुरूमध्ये पार पडली. त्याठिकाणी विरोधकांच्या आघाडीने आपल्या आघाडीचे नाव 'इंडिया' ठेवले. त्या बैठकीत नितीश कुमार यांची भूमिका खूप महत्त्वाची होती,असेही रमेश यांनी म्हटले. रमेश यांनी म्हटले की, काँग्रेस आणि इंडिया आघाडीची प्राथमिकता ही भाजपचा पराभव करणे ही आहे. पश्चिम बंगालमध्ये भारत जोडो न्याय यात्रा पुन्हा सुरू होणार आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री या यात्रेत सहभागी झाल्यास आम्हाला आनंद होईल असेही रमेश यांनी म्हटले.

### भाजपचा पराभव हेच लक्ष्य

» जयराम रमेश यांनी म्हटले की, राज्य पातळीवर आम्हाला अनेक अडचणींना सामना करावा लागू शकतो. मात्र, या आघाडीच्या शिल्पकारांपैकी नितीशकुमार हे एक शिल्पकार आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीदेखील या आघाडीच्या शिल्पकारांपैकी एक आहेत. ही आघाडी राष्ट्रीय आघाडी आहे. त्यामुळे स्थानिक मुद्यांपेक्षा राष्ट्रीय मुद्यांना प्राथमिकता दिली जात असल्याचे त्यांनी म्हटले. तेच मुख्यमंत्री राहतील, असे सांगण्यात येत आहे. अशा स्थितीत नितीशकुमार यांना फक्त राजदच्या आणि त्यांच्यासोबत आघाडीतील मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करावे लागेल.

# अखिलेशकडून काँग्रेसची बोळवण

## » यूपीत काँग्रेसला देणार फक्त 11 जागा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इंडिया आघाडीची स्थापना झाल्यानंतर भाजपाला कडवी टक्कर देण्याची भाषा काँग्रेस आणि इतर घटक पक्षांनी वापरली होती. मात्र निवडणूक जशी जशी जवळ येत आहे, तसे अनेक पक्ष स्वबळावर लढण्याची घोषणा करत आहेत. नितीश कुमार यांनी तर बिहारमध्ये पुन्हा एकदा भाजपाशी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. दोन दिवसांनी त्यांचा भाजपाबरोबर शपथविधी पार पडल्यानंतर यावर शिक्कामोर्तब होऊ शकेल.**





तर पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या ममता बॅनर्जी आणि पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने स्वबळावर लोकसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर आता इतर राज्यातील प्रादेशिक पक्षही काँग्रेसला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत. उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या सर्वाधिक ८० जागा आहेत. याठिकाणी समाजवादी पक्षाने काँग्रेसला ११ जागा देऊ केल्या आहेत. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी एक्स अकाऊंटवर याची घोषणा केली. माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी एक्सवर पोस्ट टाकत म्हटले, “काँग्रेसबरोबर आमची ११ जागांवर सहमती झाली आहे. आमच्या सौहार्दपूर्ण आघाडीची ही चांगली सुरुवात झाली आहे. आमची आघाडी विजयाच्या समीकरणासह पुढे जाईल. इंडिया आघाडीची टीम आणि पीडीएची रणनीती एक नवा इतिहास घडवेल.” (पीडीए म्हणजे – पिछडा, दलित, अल्पसंख्याक) काँग्रेस यूपीमध्ये ८० पैकी २३ जागांवर निवडणूक लढवू इच्छिते, अशा चर्चा मध्यंतरी सुरू होत्या. मात्र आता समाजवादीचे प्रमुख अखिलेश यांनी जाहीर केल्यामुळे ११ जागा काँग्रेसला मिळतील, असे दिसत आहे.समाजवादी पक्षाने जागावाटपाचा आकडा जाहीर केला असला तरी उत्तर प्रदेश काँग्रेसने त्यावर नाराजी व्यक्त केली आहे. अखिलेश यादव यांनी हा एकतर्फी निर्णय घेतला असून त्याबाबत काँग्रेसची सहमती नाही, असेही राज्यातील काँग्रेस नेत्यांनी सांगितले आहे. समाजवादी पक्षाने काँग्रेसला ११ तर राष्ट्रीय लोकशाही दल या पक्षाला सात जागा सोडल्या आहेत.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांची अधिकृत आघाडी झाली नव्हती.

# राजकीय गदारोळात विनोद तावडे बिहारमध्ये

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

जनता दल (संयुक्त) अर्थात जदयूचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे इंडिया आघाडीतून बाहेर पडणार असल्याची शक्यता गेल्या काही दिवसांपासून वर्तवली जात आहे. नितीश कुमार यांनी लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल पक्षाशी आघाडी करत राज्यात सरकार स्थापन केलं होतं. परंतु, नितीश कुमार आता या आघाडीतून बाहेर पडून भाजपाशी हातमिळवणी करणार असल्याचं बोललं जात आहे. येत्या रविवारी, २८ जानेवारी रोजी त्यांचा भाजपाबरोबर शपथविधी होईल, अशी बातमी राजकीय सूत्रांच्या हवाल्याने द इंडियन एक्सप्रेसने दिली आहे. नितीश कुमार मुख्यमंत्री तर भाजपा नेते सुशीलकुमार मोदी हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. त्यांच्याबरोबर आणखी एका उपमुख्यमंत्र्याची नेमणूक केली जाऊ शकते. बिहारबाबत एका बाजूला भाजपा हायकमांडची दिल्लीत खलबतं सुरू आहेत. दरम्यान, भाजपाचे प्रभारी विनोद तावडे पाटण्यात दाखल झाले आहेत. तावडे बिहारला गेल्यामुळे मोठ्या राजकीय बदलांबाबत चर्चा सुरू झाली आहे. विनोद तावडे पाटण्यात भाजपा नेते, आमदार, खासदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. या बैठकीत सत्तास्थापन करणे आणि मंत्रिपदांबाबत चर्चा होईल असं सांगितलं जात आहे. ही बैठक पूर्णपणे राज्यातील घडामोडींवर केंद्रीत असेल. दरम्यान, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार एका कार्यक्रमानिमित्त बक्सर येथे गेले होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर भाजपाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अश्विनी चौबेदेखील उपस्थित होते.

# लग्नाच्या तीन वर्षानंतर यामी गौतम होणार आई

यामी गौतम बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आपल्या अभिनयाने तिने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. आतापर्यंत तिने अनेक निरनिराळ्या भूमिका साकारल्या आहेत. सोशल मीडियावर यामी मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत ती चाहत्यांना अपडेट देत असते. तीन वर्षांपूर्वी यामीने दिग्दर्शक आदित्य धरबरोबर लग्नगाठ बांधली. दरम्यान, यामीचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवरून ती गरोदर असल्याची चर्चा सुरू आहे. नुकतेच यामी व आदित्य मुंबईत एका ठिकाणी कामानिमित्त आले होते. त्यावेळी यामीच्या अंगावर गुलाबी रंगाचा ड्रेस होता; तर आदित्यने पांढऱ्या रंगाचा कुर्ता-पायजमा आणि त्यावर निळ्या रंगाचे नेहरू जॅकेट परिधान केले होते. या सगळ्यात सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले ते यामीच्या कृतीने. व्हिडीओमध्ये यामी ओढणीने आपले बेबी बंप लपवत असल्याची चर्चा सुरू आहे. यामीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. अनेकांनी त्यावर कमेंट करीत तिला “तू, गरोदर आहेस का,” असा प्रश्नही विचारला आहे. तर काहींनी तिचे व आदित्यचे अभिनंदनही केले आहे.यामी गौतम व आदित्य धरचा विवाहसोहळा ४ जून २०२१ रोजी पार पडला. दोघांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. हिमाचल प्रदेशमधील मंडी येथील यामीच्या घरी हा लग्नसोहळा पार पडला होता. २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘उरी : द सर्जिकल स्ट्राईक’ या चित्रपटासाठी यामी व आदित्यने एकत्र काम केले होते. या चित्रपटानंतर दोघे काही वर्षे एकमेकांना डेट करीत होते.यामी गौतमच्या कामकाजाबद्दल बोलायचे झाले, तर तिने ‘विकी डोनर’ चित्रपटातून करिअरला सुरुवात केली. या चित्रपटात तिच्याबरोबर आयुष्मान खुरानाची प्रमुख भूमिका होती. गेल्या वर्षी तिचा ‘OMG 2’ प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. अक्षय कुमार, पंकज त्रिपाठी हे नामांकित अभिनेते असलेल्या या चित्रपटात तिने एका वकिलाची भूमिका साकारली होती. लवकरच यामी अभिनेत्री प्रिया मणीबरोबर ‘आर्टिकल ३७०’ चित्रपटात झळकणार आहे.

## मला गांजा खूप आवडतं

बॉलीवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीने खुलासा केला आहे की तो नियमित मद्यपान करत नाही. तो दारू पितो, पण क्वचितच पितो आणि खूप कमी पितो. त्याने एक जुनी आठवण सांगितली. होळीच्या वेळी स्वानंद किरकिरेंनी त्याला थंडाई प्यायला लावली होती, ज्याचा त्याच्यावर दोन दिवस परिणाम झाला होता. एका मुलाखतीत नवाजुद्दीनला त्याच्या आवडत्या दारूबद्दल विचारण्यात आलं. उत्तर देत अभिनेता म्हणाला, “मी क्वचितच दारू पितो पण मी खूप कमी पितो, थोडी प्यायलावरही मला झेपत नाही.” मग त्याला विचारण्यात आलं की पहिल्यांदा तू कधी दारू प्यायला होता. त्यावर तो म्हणाला, “मी पहिल्यांदा एनएसडीमध्ये होतो तेव्हा दारू प्यायलो होतो. एका नाटकानंतर आम्ही आनंद साजरा करत होतो, तेव्हा सर्वांनी बिअर आणली. त्याआधी मी कधीही प्यायलो नाही. मी खूप साधा होतो. मी नाटकात पहिल्यांदा धूम्रपान केलं होतं.”नवाजुद्दीन म्हणाला की त्याला मद्यपान करायला फारसं आवडत नाही.

## मी स्वत:ला सिद्ध करून थकलेय!



‘सिता रामम’, ‘हाय नन्ना’ अशा चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर ही आताच्या घडीची लोकप्रिय अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य, तसेच बॉलीवूड सिनेसृष्टीतही तिच मोठे योगदान आहे. कमी काळातच प्रसिद्धीझोतात आलेली ही अभिनेत्री सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते. डिसेंबरला प्रदर्शित झालेला ‘हाय नन्ना’ हा चित्रपट हिट तर ठरलाच; परंतु त्याने बॉक्स ऑफिसवरही चांगली कामगिरी केली.अलीकडेच झालेल्या एका मुलाखतीत हिंदी रोमँटिक चित्रपटांबाबत तिचे मत विचारले असता, ती म्हणाली, “मी निर्मात्यांसमोर स्वत:ला सिद्ध करून थकली आहे.”‘पिंकविला’सह झालेल्या मुलाखतीत मृणाल ठाकूरने हिंदी चित्रपटसृष्टीवर आपले मत व्यक्त केले. हिंदी सिनेसृष्टी मृणाल ठाकूरचा योग्य रीतीने वापर करून घेत नाही, असे कमेंट्समध्ये वाचले जातेय. हिंदीत तुला लव्ह स्टोरीज ऑफर होतात का, असे मुलाखतदाराने विचारल्यावर मृणाल म्हणाली, “मला लव्ह स्टोरीज ऑफर होत नाहीत. मला माहीत नाही याचं कारण नक्की काय आहे. कदाचित मी इतकी प्रसिद्ध नसेन म्हणूनच मला लव्ह स्टोरीज मिळत नसतील.”“मला खूप चित्रपटांची ऑफर येतेय. त्यात काम करायलाही मला आवडेल. पण, रोमँटिक सिनेमांची ऑफर सध्या तरी मला येत नाही. मी आता निर्मात्यांसमोर स्वत:ला सिद्ध करून थकली आहे. आता आपोआप कुठली तरी चांगली संधी चालून यावी, असं वाटतंय,” असे मृणालने नमूद केले.एका युजरने या मुलाखतीची एक क्लिप शेअर केली आहे; जी सध्या व्हायरल होतेय. त्यावर नेटकऱ्यांनी हिंदी चित्रपट निर्मात्यांबाबत निराशा व्यक्त केली आहे. मृणाल ठाकूर ही ‘बाटला हाउस’, ‘धमाका’, ‘जर्सी’ अशा विविध हिंदी चित्रपटांमध्ये झळकली. मृणाल ठाकूरच्या आगामी चित्रपटाबाबत सांगायचे झाले, तर ‘फॅमिली स्टार’ हा तेलुगू भाषिक चित्रपट २२ मार्चला प्रदर्शित होणार असून, या चित्रपटात साउथ स्टार विजय देवरकोंडा हा मृणालचा सहकलाकार आहे.

‘सिता रामम’, ‘हाय नन्ना’ अशा चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर ही आताच्या घडीची लोकप्रिय अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य, तसेच बॉलीवूड सिनेसृष्टीतही तिच मोठे योगदान आहे. कमी काळातच प्रसिद्धीझोतात आलेली ही अभिनेत्री सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते. डिसेंबरला प्रदर्शित झालेला ‘हाय नन्ना’ हा चित्रपट हिट तर ठरलाच; परंतु त्याने बॉक्स ऑफिसवरही चांगली कामगिरी केली.

## भर गर्दीत चाहतीने बॉबी देओलला केलं किस

बॉलीवूड सुपरस्टार बॉबी देओलने ९० च्या दशकापासून ते आतापर्यंत अनेक हिट चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. ‘सोल्जर’, ‘गुप्त’, ‘बरसात’ असे हिट चित्रपट बॉबी देओलच्या नावावर आहेत. आजही तो चित्रपटसृष्टीत तितकाच सक्रिय आहे. ‘ॲनिमल’मधून दमदार कमबॅक करणाऱ्या बॉबी देओलचं एक वेगळंच रूप प्रेक्षकांना अनुभवायला मिळालं. यात त्याने खलनायकाची भूमिका इतकी अप्रतिम साकारली की त्याच्या छोट्याशा भूमिकेचं किंबहुना रणबीरपेक्षाही जास्त कौतुक झालं. या चित्रपटातील ‘जमाल कुडू’ या गाण्यावर बॉबी देओल डोक्यावर दारूचा ग्लास घेत थिरकताना दिसला होता, हे गाणंही खूप व्हायरल झालं. आज २७ जानेवारी रोजी बॉबी देओलचा ५५ वा वाढदिवस आहे. कलाकार त्यांचे वाढदिवस नेहमीच वेगवेगळ्या पद्धतीने साजरे करताना दिसतात. बॉबी देओलने आज मीडिया, सहकलाकार तसेच त्याच्या चाहत्यांसह वाढदिवस साजरा केला. त्याच्या आजच्या वाढदिवसाचे व्हिडिओ व्हायरल होताना दिसत आहेत.असाच एक व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आहे. यात बॉबीची एक चाहती सेल्फीसाठी त्याला विनंती करताना दिसत आहे. बॉबीने फोटो काढण्यासाठी चाहतीचा फोन घेतला आणि सेल्फी काढला. त्यानंतर अचानक त्या चाहतीने चक्क बॉबीच्या गालावर किस केलं. यानंतर क्षणभर बॉबी गोंधळला आणि नंतर तो हसला. व्हिडीओमध्ये निळ्या रंगाच्या ट्रॅकसूट आणि काळ्या हॅटमध्ये बॉबी देओल अतिशय देखणा दिसत आहे. बॉबी देओलसाठी त्याच्या चाहत्यांनी केक आणून त्याचा वाढदिवस साजरा केला. अनेकजण त्याच्यासह फोटो काढत ‘ॲनिमल’ चित्रपटातील अबरारची पोज देतानाही दिसले.



## फायटर’ची बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई

हृतिक रोशन, दीपिका पदुकोण यांचा बहुचर्चित चित्रपट गुरुवारी (ता. २५ जानेवारी) प्रदर्शित झाला. अनेक दिवसांपासून या चित्रपटाची चर्चा खूप रंगली होती. ‘फायटर’चा दमदार ट्रेलर बघितल्यानंतर चाहते चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर हा चित्रपट प्रदर्शित झाला. सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरघोस प्रतिसाद मिळताना दिसत आहे. पहिल्याच दिवशी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. आता चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत. ‘सॅकनिल्क’च्या रिपोर्टनुसार, ‘फायटर’ने पहिल्या दिवशी २२ कोटी रुपयांची कमाई केली होती; तर जगभरात या चित्रपटाने ३५ कोटींचा गल्ला जमवला होता. दुसऱ्या दिवशी या चित्रपटाने ३९ कोटी रुपयांची कमाई केली आहे.चित्रपटाच्या कमाईत वाढ होताना दिसत आहे.फायटर’ सुमारे २५० कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. देशभरातील चार हजार २०० स्क्रीन्सवर हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. ‘फायटर’ चित्रपटाची क्रेझ बघायला मिळत आहे; तर दुसरीकडे आखाती देशांमध्ये या चित्रपटावर बंदी घालण्यात आली आहे.

# रोहन बोपन्नाने रचला इतिहास!

## » बोपन्ना-मॅथ्यू एबडेनची 'ऑस्ट्रेलियन ओपन'वर मोहोर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताचा दिग्गज टेनिसपटू रोहन बोपन्नाने पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन ओपनचा किताब जिंकलाय. बोपन्नाने शनिवारी (दि.27) साथीदार मॅथ्यू एबडनसोबत ऑस्ट्रेलियन ओपन 2024 च्या अंतिम फेरीत विजय मिळवला. 43 वर्षीय बोपन्नाने मॅथ्यू एबडनच्या साथीने इटलीच्या सिमोन बोलेली आणि एंड्रिया वावस्सोरी यांना 7-6 आणि 7-5 च्या फरकाने धूळ चारली. या विजयासह रोहन बोपन्नाने इतिहास रचलाय. हा बोपन्नाच्या कारकिर्दीतील पहिला दुहेरी ग्रँड स्लॅमचा किताब आहे. त्याने एकूण दोन ग्रँड स्लॅमच्या किताबावर नाव कोरले आहे. यापूर्वी 2017 मध्ये डॅब्रियला डाब्रोवस्कीच्या साथीने फ्रेंच ओपन मिश्रित दुहेरी ग्रँड स्लॅम जिंकला होता.**



रोहन बोपन्ना ग्रँड स्लॅम जिंकणारा सर्वांत वयस्कर खेळाडू ठरलाय. सोबतच तो चॅम्पियन बनणारा वयस्कर खेळाडू आहे. त्याने जीन ज्युलियन रोजरचा विक्रम मोडित काढलाय. नेदरलँडच्या जीनने 40 वर्षे आणि 9 महिने एवढे वय असताना फ्रेंच ओपनचा दुहेरी किताब जिंकला होता. बोपन्नाने अंतिम फेरीत विजय मिळवल्यानंतर मॅथ्यू एडबनचे कौतुक केले आहे. तो ग्रँड स्लॅम जिंकणारा तिसरा भारतीय खेळाडू ठरलाय. बोपन्ना यावेळी म्हणाला, "मी 43 व्या लेवलचा आहे, 43 वर्षांचा नाही. हे माझ्या ऑस्ट्रेलियन साथीदाराशिवाय शक्य नव्हते." बोपन्ना यापूर्वी 2013 आणि 2023 अमेरिकन ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. मात्र, अंतिम फेरीत त्याला पराभवाचा सामना करावा लागला होता. पहिल्या सेटच्या पहिल्या गेममध्ये सलग पॉईंट घेत रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन जोडीने दमदार सुरुवात केली; पण सिमोन बोलेली आणि अँड्रिया वाव्हासोरी जोडीनेही दमदार खेळीचे प्रदर्शन केला. यामुळे पहिल्या सेटमध्ये ३-३ अशी बरोबर झाली. त्यानंतर चौथा गेम जिंकून बोपण्णा-एबडेन जोडीने ४-३ अशी आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा बोलेली-वाव्हासोरी जोडीने सलग पॉईंट मिळवत ४-४ अशी बरोबरी साधली. त्यानंतर बोपण्णा- एबडेन जोडीने ५-४ अशी आघाडी घेतली. पण पुन्हा ५-५ अशी बरोबरी झाली. पहिल्या सेटमध्ये सावध खेळाचा पवित्रा घेत दोन्ही जोड्यांनी सर्व्हिस कायम राखण्याचा प्रयत्न केला. रोहन बोपण्णा याने आपला जोडीदार मॅथ्यूच्या उणीवा कमी करण्याचा प्रयत्न करत सामन्यातील पकड कायम ठेवली. पहिल्या सेटमध्ये ६-६ बरोबरी साधल्यानंतर सेट ट्रायब्रेकरमध्ये गेला. ट्रायब्रेकरमध्ये निर्विवाद वर्चस्व राखत रोहन- मॅथ्यू जोडीने सलग ७ पॉईंट घेत सेट आपल्या नावावर केला. त्यांनी पहिला सेट ७-६ (७-०) असा जिंकला.दुसर्या सेटमध्ये रोहन-एबडेन आणि सिमोन-अँड्रिया यांनी उत्कृष्ट खेळीचे प्रदर्शन करत आपली सर्व्हिस कायम राखत सामन्यात ५-५ अशी बरोबरी साधली. सहाव्या गेममध्ये रोहन आणि एबडेन यांनी सिमोन-अँड्रिया यांची सर्व्हिस ब्रेक करत दुसर्या सेटमध्ये ६-५ अशी आघाडी घेतली. यानंतर दुसरा सेट ७-५ असा नावावर केला.ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत रोहन बोपण्णा याने वयाच्या ४३ व्या वर्षी बुधवारी (२४ जानेवारी) इतिहास रचला होता. जोडीदार मॅथ्यू एबडेनसह त्याने ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरी गाठली होती. त्यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टेनी या जोडीचा ६-४, ७-६ (७-५) असा पराभव केला होता. या विजयामुळे रोहन बोपन्ना टेनिस पुरुष दुहेरीत जगातील नंबर १ टेनिसपटू बनला होता. विशेष म्हणजे वयाच्या ४४ व्या वर्षी तो पहिल्यांदाच टॉपवर पोहोचला. अशी कामगिरी करणारा सर्वात वयस्क खेळाडू तो ठरला. यानंतर ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन यांनी चीनच्या बिगरमानांकित झांग झिझेन आणि चेक प्रजासत्ताकच्या टॉमस माचक यांचा असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

### मॅथ्यू एडबनचे केले कौतुक

» आता रोहन बोपण्णा हा ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकणारा सर्वात वयस्क अग्रनामांकित टेनिसपटू ठरला आहे.रोहन बोपन्ना ग्रँड स्लॅम जिंकणारा सर्वांत वयस्कर खेळाडू ठरलाय. सोबतच तो चॅम्पियन बनणारा वयस्कर खेळाडू आहे. त्याने जीन ज्युलियन रोजरचा विक्रम मोडित काढलाय. नेदरलँडच्या जीनने 40 वर्षे आणि 9 महिने एवढे वय असताना फ्रेंच ओपनचा दुहेरी किताब जिंकला होता. बोपन्नाने अंतिम फेरीत विजय मिळवल्यानंतर मॅथ्यू एडबनचे कौतुक केले आहे. तो ग्रँड स्लॅम जिंकणारा तिसरा भारतीय खेळाडू ठरलाय. बोपन्ना यावेळी म्हणाला, "मी 43 व्या लेवलचा आहे, 43 वर्षांचा नाही.

# पोपच्या शतकाने इंग्लंडचे सामन्यात दमदार पुनरागमन

## » 190 धावांच्या पिछाडीनंतर इंग्लंडची भारतावर 126 धावांची आघाडी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत विरुद्ध इंग्लंड मालिकेतील पहिल्या कसोटी सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला जात आहे. तिसऱ्या दिवशी ओली पॉप दमदार शतकी खेळी करत इंग्लंडच्या संघाला सामन्यात मोठी आघाडी मिळवून दिली आहे. दुसऱ्या डाव्यात इंग्लंडने तिसऱ्या दिवसअखेर 316 धावा केल्या असून 6 विकेट्स गमावल्या आहेत. सामन्याचे आणखी दोन दिवस उरले आहेत. ओली पॉपच्या शतकी खेळीमुळे इंग्लंडकडे आता 126 धावांची आघाडी आहे.**

इंग्लंडचा टॉप ऑर्डर फलंदाज ओली पॉप याने 208 चेंडूमध्ये नाबाद 148 धावांची खेळी केली आहे. त्याने 17 चौकारांच्या सहाय्याने ही शतकी खेळी केली. ओली पॉप शिवाय इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला 50 धावांचा टप्पा पार करता आलेला नाही. इंग्लंडकडून, बेन डकेट 52 चेंडूमध्ये 47, झॅक क्रॅवले 33 चेंडूमध्ये 31, ब्रेन फोक्स 81 चेंडूमध्ये 34 तर रेहान अहमदने नाबाद राहत 16 धावांचे योगदान दिले. भारत विरुद्ध इंग्लंड पहिल्या कसोटीच्या चौथ्या दिवसाकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. कारण चौथ्या दिवशी इंग्लंडचा संघ भारतासमोर किती धावांचे आव्हान देणार?ओली पॉपच्या शतकी खेळीने आजचा दिवस इंग्लंडने आपल्या नावावर केला आहे. त्यामुळे उद्या इंग्लंडचा संपूर्ण संघ बाद करत आव्हानाकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने टीम इंडिया मैदानात उतरणार आहे. दुसऱ्या दिवसअखेर भारताने सामन्यात 175 धावांची आघाडी घेत सामन्यावरिल पकड मजबूत केली होती. मात्र, तिसऱ्या दिवशी भारताला केवळ 15 धावाच करता आल्या. भारताची तब्बल 190 धावांची आघाडी इंग्लंडच्या संघाने मोडून काढली आहे. भारताकडून जसप्रीत बुमराह आणि रवीचंद्रन अश्विनने प्रत्येकी 2 तर अक्षर पटेल आणि रवींद्र जाडेजाने प्रत्येकी 1 विकेट पटकावली आहे. ओली पोपने आक्रमक फलंदाजी करताना आपले शतक पूर्ण केले आहे. त्याने यष्टीरक्षक फलंदाज बेन फॉक्ससोबत सहाव्या विकेटसाठी शतकी भागीदारीही केली. या भागीदारीने भारतीय गोलंदाजांवर दबाव आणला. मात्र, अक्षर पटेलने फॉक्सच्या विकेटने ही भागीदारी तोडली. बेन फॉक्स ३४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. पोपने २०८ चेंडूत १७ चौकारांच्या मदतीने नाबाद १४८ धावा केल्या आहेत. यादरम्यान रेहान अहमदने त्याला साथ दिली आणि ३१ चेंडूत दोन चौकारांच्या मदतीने नाबाद १६ धावा केल्या. ऑली पोपचे शतक इंग्लंडसाठी संजीवनी ठरले. पोपच्या शतकापूर्वी इंग्लंडचा संघ जवळपास सामन्यातून बाहेर पडला होता, मात्र आता त्यांनी पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केले आहे.भारताने तिसऱ्या दिवसाची सुरुवात केली, तेव्हा त्यांच्या तीन विकेट्स शिल्लक होत्या. पण यजमान संघाला तीन विकेटचा योग्य वापर करता आला नाही. म्हणजेच तिसऱ्या दिवशी टीम इंडियाने ३ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १४ धावा केल्या होत्या. यादरम्यान जो रूटने रवींद्र जडेजा आणि बुमराहला बाद केले.




### जडेजाने सर्वाधिक 87 धावा केल्या

» टीम इंडियाने पहिल्या डावात ४३६ धावा केल्या. पहिल्या डावाच्या जोरावर भारताने इंग्लंडविरुद्ध १९० धावांची आघाडी घेतली आहे. भारताकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक ८७ धावा केल्या. रवींद्र जडेजाशिवाय केएल राहुलने ८६ धावांची आणि यशस्वी जैस्वालने ८० धावांची खेळी खेळली.